सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन

वस्तू व सेवाकर विभाग छत्रपती संभाजीनगर

**अपर राज्यकर आयुक्त यांचे कार्यालय,वस्तू व सेवा कर भवन, रेल्वेस्टेशन समोर, पहिला मजला**

**छत्रपती संभाजीनगर क्षेत्र, छत्रपती संभाजीनगर -४३१००५**

जा.क्र. अराआ/छ. संभाजीनगर क्षेत्र/ माळी (गट ड) /अंतिम ज्येष्ठता/२०२४-२५/ब-164 छ. संभाजीनगर, दि. 21/03/2025

## परिपत्रक

**विषय –** माळी (गट- ड) या संवर्गातील कर्मचाऱ्यांची दि. ०१/०१/२०२५ रोजीची अंतिम ज्येष्ठता यादी प्रसिद्ध करणेबाबत

**संदर्भ –** १. शासन निर्णय क्र. एसआरव्ही-२०११/प्र.क्र.२८४/१२, मुंबई, दि. २१/१०/२०२१

२. महाराष्ट्र नागरी सेवा (ज्येष्ठतेचे विनियमन) नियमावली, २०२१

३. छ. संभाजीनगर परिक्षेत्रातील सर्व आस्थापना अधिकाऱ्यांकडून प्राप्त माळी (गट- ड) संवर्गाची माहिती

४. माळी (गट ड) संवर्गाची तात्पुरती सेवा ज्येष्ठता सूची ब - ९४, दि.२४/०२/२०२५

५. राज्यकर सहआयुक्त (प्रशा.), नांदेड कार्यालयाचे आक्षेपाबाबत पत्र

वस्तू व सेवाकर विभागाच्या पुनर्रचनेनंतर छत्रपती संभाजीनगर परिक्षेत्र नव्याने अस्तित्वात आलेले आहे. माळी (गट - ड) संवर्गातील कर्मचाऱ्यांची दि. ०१/०१/२०२५ रोजीची अंतिम ज्येष्ठता सूची या परिपत्रकासोबत प्रसिध्द करण्यात येत आहेत. सदर ज्येष्ठता यादी तयार करतांना महाराष्ट्र नागरी सेवा (ज्येष्ठतेचे विनियमन) नियमावली, २०२१ मधील लागू असलेले नियम विचारात घेण्यात आलेले आहेत. त्यामधील मुख्य तरतुदी खालीलप्रमाणे नमूद करण्यात येत आहेत.

1. महाराष्ट्र नागरी सेवा (ज्येष्ठतेचे विनियमन) नियमावली, २०२१ मधील नियम ३ (१) प्रमाणे या नियमावलीतील अन्य तरतुदींच्या अधीनतेने कोणतेही पद, संवर्ग किंवा सेवा यामधील शासकीय कर्मचाऱ्यांची ज्येष्ठता सामान्यपणे त्यांच्या त्या पदावरील, संवर्गातील किंवा सेवेतील अखंडित सेवाकालावरुन निश्चित करण्यात येईल.
2. सरळसेवा/अनुकंपा तत्वावर नियुक्ती दिलेल्या कर्मचाऱ्यांची ज्येष्ठता निश्चित करतांना महाराष्ट्र नागरी सेवा (ज्येष्ठतेचे विनियमन) नियमावली, २०२१ मधील नियम ३ (२) (अ) प्रमाणे 'जेथे कोणत्याही २ किंवा अधिक व्यक्तींच्या नावे एखादे पद, संवर्ग किंवा सेवा यातील नेमणुकींच्या

तारखा, आवश्यक तर मानीव तारीख नमूद केल्यानंतर निर्धारित केलेल्या तारखा एकच असतील तर, वयाने ज्येष्ठ असलेल्या व्यक्तीला ज्येष्ठता क्रम निर्धारीत करण्याच्या प्रयोजनार्थ ज्येष्ठ म्हणून मानले जाईल.'

3. महाराष्ट्र नागरी सेवा (ज्येष्ठतेचे विनियमन) नियमावली, २०२१ मधील नियम ३(३) प्रमाणे ' निवड सूचीतून पदोन्नती मिळालेल्या शासकीय कर्मचाऱ्यांच्या बाबतीत अशा निवडसूचीत त्यांची नावे ज्या क्रमाने असतील त्याच क्रमानुसार त्यांची आपसातील ज्येष्ठता राहील.'
4. दिव्यांग कर्मचाऱ्यांबाबत शेरा या रकान्यात, त्यांच्या नावासमोर ते दिव्यांग असले बाबतची नोंद घेण्यात आली आहे.

संदर्भ क्र. ४ वर नमुद केलेल्या परिपत्रकासोबत छत्रपती संभाजीनगर परिक्षेत्रातील माळी (गट- ड) या संवर्गातील कर्मचाऱ्यांची दि. ०१/०१/२०२५ रोजीची स्थितीस अनुसरून तात्पुरती ज्येष्ठता यादी प्रसिध्द करण्यात आलेली आहे. सदरहु यादी सर्व संबंधीत कर्मचाऱ्यांच्या निदर्शनास आणून देऊन त्यांना पडताळून पाहण्यास सांगण्यात यावे व त्याबाबतचा अहवाल या कार्यालयास सादर करण्यात यावा, अशा सूचना छत्रपती संभाजीनगर परिक्षेत्रातील सर्व आहरण व संवितरण अधिकारी यांना देण्यात आल्या होत्या. त्यानुसार छत्रपती संभाजीनगर परिक्षेत्रातील आहरण व संवितरण अधिकारी यांनी संबंधित कर्मचाऱ्यांच्या स्वाक्षरींच्या प्रती अहवालासह या कार्यालयास सादर केल्या असून, प्राप्त आक्षेपांवर योग्य कार्यवाही करून अंतिम सेवा ज्येष्ठता यादी तयार करण्यात आलेली आहे. यास्तव सदरहू ज्येष्ठता याद्या अंतिम ज्येष्ठता याद्या म्हणून या परिपत्रकासोबत प्रसिध्द करण्यात येत आहेत.

**सोबत** - माळी (गट- ड) या संवर्गातील कर्मचाऱ्यांची अंतिम ज्येष्ठता यादी.

अपर राज्यकर आयुक्त छ.संभाजीनगर, क्षेत्र

**जितेंद्र रा. बनसोडे**
**अपर राज्यकर आयुक्त,**
**छत्रपती संभाजीनगर परिक्षेत्र,**
**छत्रपती संभाजीनगर**

**प्रत सविनय सादर :-**
१. मा. विशेष राज्यकर आयुक्त, महाराष्ट्र राज्य, मुंबई

**प्रत योग्य त्या कार्यवाहीस्तव रवाना:-**
१. छत्रपती संभाजीनगर क्षेत्रातील सर्व आस्थापना अधिकारी

शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्र. एसआरव्ही - २०१६/प्र.क्र २८१/१२, दि. २१/०६/२०२१ सोबतचे परिशिष्ट तीन

वस्तू व सेवा कर विभागाच्या छत्रपती संभाजीनगर परिक्षेत्रात दि. ३१/१२/२०२४ अखेरपर्यंत नियुक्ती झालेल्या माळी (गट-ड) संवर्गातील कर्मचाऱ्यांची ०१/०१/२०२५ रोजीची अंतिम सेवा ज्येष्ठता सूची

जा.क्र. अराआ/छ. संभाजीनगर क्षेत्र/माळी (गट-ड)/अंतिम ज्येष्ठता/२०२४-२५/ब-७६१ छ. संभाजीनगर, दि. २१/०२/२०२५

| अ.क्र. | ज्येष्ठता क्रमांक | श्री/श्रीमती | कर्मचाऱ्याचे नाव | निवड प्रवर्ग | जन्म दिनांक | सेवेत दाखल झाल्याचा दिनांक | नियुक्तीचा मार्ग | सद्याच्या पदावरील नियुक्तीचा दिनांक | सेवा निवृत्तीचा दिनांक | शैक्षणिक पात्रता | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 1 | श्रीमती | शोभाबाई शामराव मिराशे | खुला | १२.०९.१९७० | ०३.०९.२००७ | अनुकंपा | ०३.०९.२००७ | ३०.०९.२०३० | ४ थी पास | |

जितेंद्र बनसोडे
अपर राज्यकर आयुक्त
छ. संभाजीनगर क्षेत्र, छत्रपती संभाजीनगर